महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक कार्यालय ,**
**यवतमाळ**
एल. आय. सी. चौक, यवतमाळ.

Email IDsp.yavatmal@mahapolice.gov.in
जा.क्र. — पोअकाय/२०२५/ यवतमाळ.

दुरध्वनी क्र. ०७२३२ २५६७०१
दिनांक - दि. 05/02/2025

# प्रेसनोट

## यवतमाळ जिल्हा पोलीस दलातर्फे महिला पोलीस व पोलीस अर्धांगीनी यांचे संयुक्त विद्‌यमाने दि.04/02/2025 रोजी उत्साहात पार पडला हळदी-कुंकु समारंभ.

दि. .04/02/2025 रोजी यवतमाळ जिल्हा पोलीस दलातर्फे महिला पोलीस अधिकारी व अमलदार तसेच सर्व पोलीस अधिकारी व अमलदार यांच्या कुटुंबातील महिलांकरीता यवतमाळ जिल्हयाचे कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक मा. श्री कुमार चिंता पोलीस अधीक्षक यवतमाळ, व अपर पोलीस अधिक्षक मा. श्री पियुष जगताप यवतमाळ तसेच पोलीस अधिक्षक, यवतमाळ श्री कुमार चिंता यांच्या अर्धांगीनी प्रो. सौ.दिव्या कूमार चिंता, यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षता लॉन येथे हळदीकुंकु कार्यक्रम आयोजीत करण्यात आले होते. सदर कार्यक्रम पोलीस दलातील महिलांच्या उपस्थितीत मोठया उत्साहात संपन्न झाला. उपस्थीत सर्व महिलांना तिळगुळ आणि भेटवस्तू वान म्हणुन देण्यात आल्यात.

या प्रसंगी प्रमुख अतिथी प्रो.सौ.दिव्या कूमार चिंता यांनी पोलीस विभागात कार्यरत असणाऱ्या महिलांचे विषेश कौतुक केले. सर्व महिलांना हळदि कुंकु समारंभाचे निमीत्ताने प्रत्यक्ष काम करत असतांना कीती अडचणींना सामोरे जावं लागतं व त्यातुन महिला वर्ग कुटुंब आणी कार्यालय कशा चांगल्या पध्दतीने सांभाळतात अशा प्रकारे कौतुक करुन पुढिल वाटचाली करीता शुभेच्छा दिल्यात. याप्रसंगी कार्यक्रमास उपस्थीत असलेल्या सौ. मैथीली रामेश्वर वैजने, सौ. रोहिणी गणेश कींद्रे, यांनी हळदीकुंकु समारंभाचे नीमीत्ताने महिलांबरोबर संवाद साधला, सौ. स्वरुपा दिनेश बैसाने यांनी सर्व महिलांना हळदि कुंकु समारंभाचे निमीत्ताने शुभेच्छा दिल्या.

दि. .04/02/2025 रोजी दक्षता लॉन, यवतमाळ येथे पोलीस दलातर्फे महिला पोलीस अधिकारी व अमलदार तसेच सर्व पोलीस अधिकारी व अमलदार जिल्हा यांच्या अर्धांगीनी, करीता आयोजीत कार्यक्रमास प्रो.सौ.दिव्या कूमार चिंता, सौ. मैथीली रामेश्वर वैजने, सौ. रोहिणी गणेश कींद्रे, सौ. स्वरुपा दिनेश बैसाने, सर्व पोलीस निरिक्षक, सहायक पोलीस नीरीक्षक, पोलीस उपनीरीक्षक, महिला पोलीस अधिकारी, महिला पोलीस अंमलदार, पोलीस अधीकरी, व अंमलदार यांच्या पत्नी हजर होत्या, हळदिकुंकु कार्यक्रमाचे नीमीत्ताने पोलीस महिला अंमलदार, पोलीस महिला अधिकरी, पोलीस अधीकरी, व अंमलदार यांच्या पत्नी यांनी नृत्य व गीतगायन करुन कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे संचालन सहायक पोलीस नीरीक्षक, शुभांगी गुल्हाने, जनसंपर्क अधीकारी, व सहायक पोलीस नीरीक्षक, नीलीमा सातव, महिला सेल, यवतमाळ यांनी केले. पोलीस निरीक्षक, यशोधरा मुनेश्वर प्रभाती अधिकरी, पोलीस स्टेशन लोहारा यांनी महिलांचे आभार मानुन व महिलांबरोबर सहभोजन करुन कार्यक्रमाची सांगता केली.

Gulhane

शुभांगी रामभाउजी गुल्हाने
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner